# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.06.2024** **वार – गुरुवार**

---

**<u>देहू आळंदी सज्ज</u>**

आषाढी वारीसाठी संत श्री तुकाराम महाराज पालखी उद्या देहू नगरीतून प्रस्थान ठेवणार आहे. या सोहळ्यासाठी देहू नगरी सज्ज झाली असून राज्याच्या कानाकोपऱ्यांतून लाखों वारकरी देहुत दाखल होत आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेनंही पालखी सोहळ्याची पूर्ण तयारी केली आहे. यंदाची वारी हरित वारी करण्यासाठी वारी मार्गावर वृक्षारोपण करण्यात येणार आहे. पालखी आणि दिंड्यांच्या मुक्कामच्या ठिकाणी स्वागत कक्ष, तात्पुरती स्नानगृह, शौचालय, अन्नछत्र, रुग्णवाहिका तसच विशेष आपत्ति कक्ष उभारण्यात आला आहे. पालखी सोहळ्यावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार असून गर्दीचं नियोजन करण्यासाठी मनोरे उभारण्यात येणार आहेत. तसच अतिरिक्त पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.

**<u>आयटी दिंडी</u>**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळयात यंदा दोन हजारांहून अधिक आयटिन्स आणि विविध क्षेत्रात काम करणारे नोकरदार, व्यावसायिक आयटी दिंडीत सहभागी होणार आहेत. आयटी दिंडीत महाराष्ट्रासह दिल्ली, बेंगलोर, कोलकत्ता, चेन्न्ई आदी शहरातील तरुणाईही सहभागी होणार असल्याचं आयटी दिंडीचे समन्वयक सचिन झापकर यांनी सांगितलं.

**<u>नदी प्रदूषण</u>**

संत श्री ज्ञानेश्वर माउली आणि संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहोळा प्रस्थानाच्या पार्श्वभूमीवर दूषित झालेल्या इंद्रायणी, भीमा आणि नीरा या तिन्ही नद्यांच्या प्रदूषण प्रश्नावर राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळानं देहूगाव आणि आळंदी नगरपरिषदेसह पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील 8 स्थानिक स्वराज्य संस्थांना नोटिसा बजावल्या आहेत. येत्या 15 दिवसांत त्यावरील कृती आराखडा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान स्वतंत्र समिती नेमून येत्या दोन आठवड्यात पुणे शहरातून वाहणाऱ्या नद्यांची पूररेषा निश्चित करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं जलसंपदा विभागाला दिले आहेत. ही पूररेषा नव्यानं निश्चित करण्याची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली होती.

**<u>विजेची थकबाकी</u>**

पुणे जिल्ह्यात घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांकडे 281 कोटी 68 लाख रुपयांची थकबाकी झाली आहे. त्यामुळ महावितरणनं पुन्हा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम सुरू केली आहे. वीजपुरवठा खंडित करण्यात आल्यानंतर थकबाकीची रक्कम आणि नियमानुसार पुनर्जोडणी शुल्क अधिक जीएसटी घेतल्याशिवाय वीजपुरवठा सुरू करण्यात येणार नसल्याचं महावितरणकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

**<u>पार्किंग विमान</u>**

पुणे विमानतळावर गेल्या दीड महिन्यांपासून उभ्या असणाऱ्या एअर इंडियाच्या अपघातग्रस्त विमानाला संरक्षण दलाच्या जागेत हलवण्यात आले आहे. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी संरक्षण

मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतल्यानंतर अवघ्या 24 तासात हे विमान संरक्षण खात्याच्या जागेत 'पार्क' करण्याची परवानगी दिली. या विमानाला हलविल्यामुळे पुणे विमानतळावरील ये-जा करणाऱ्या विमानांचा विलंब टळणार आहे.

**भिडे वाडा स्मारक**

महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या भिडेवाडा इथल्या मुलींच्या पहिल्या शाळेत राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी पुणे महापालिकेने साडेआठ कोटींचे पूर्वगणनपत्रक तयार केले आहे. या पूर्वगणनपत्रकाला मंजुरी देण्यात आली आहे. पुणे महापालिकेच्या मुख्य अभियंता युवराज देशमुख यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली.

**एल 3**

एल थ्री बारमधील पार्टीत सहभागी झालेल्या तरुणांना पुण्यातील अमली पदार्थ तस्करानं अमली पदार्थ पुरवठा केल्याचं तपासात उघडकीस आलं आहे. या तस्कराचा पोलिस शोध घेत आहेत. या गुन्ह्यात पोलिसांनी अमली पदार्थविरोधी कायद्यान्वये कलमवाढ केली असल्याची माहिती पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी दिली.

**रक्तदान शिबिर**

विभागीय आयुक्त कार्यालय आणि पुणे जिल्हाधिकारी कार्यालयानं संयुक्तपणे आणि सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्यानं विभागीय आयुक्त कार्यालयात सशस्त्र सेनेतील जवान आणि सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयासाठी रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं. यावेळी 90 रक्ताच्या पिशव्या संकलित करण्यात आल्या.

**स्मरण गप्पा**

'संगीत रंगभूमी पुनर्जीवित करण्यासाठी नवीन संगीत नाटकं रंगभूमीवर येणं गरजेचं आहे. हीच नाटककार विद्याधर गोखले यांना वाहिलेली खरी आदरांजली असेल',असं मत विद्याधर गोखले यांचे चिरंजीव आणि अभिनेते विजय गोखले यांनी व्यक्त केलं. बालगंधर्व रंगमंदिरांच्या 56व्या वर्धापन दिनानिमित्त आज तिसऱ्या दिवशी दिग्गज नाटककार विद्याधर गोखले यांच्या जन्मशताब्दी निमित्त 'स्मरण, गप्पा आणि गाणी' या चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं होतं.

**झिका रुग्ण**

पुण्याच्या मुंढव्यातील कोंद्रेवस्ती परिसरात झिकाचा आणखी एक रुग्ण आढळला आहे. त्यामुळं पुण्यातील झिका बाधित रुग्णांची संख्या आता 3 वर पोहोचली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून अधूनमधून हलक्या पावसाच्या सरी पडत आहेत. उद्या ढगाळ हवामान माध्यम ते हलक्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित असून घाट माथ्यावर मात्र जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत.उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**